**L. A. BILL No. XXIX OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STATE BOARD OF TECHNICAL EDUCATION ACT, 1997.

**सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९.**

**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९९७ चा महा. ३८.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २ सप्टेंबर २०२१ रोजी, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) अध्यादेश, २०२१ प्रख्यापित केला होता ;

२०२१ चा महा. अध्या. २.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यत येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २ सप्टेंबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी १८७९—१ (५००——१२-२०२१)

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम २६ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम २६ मधील,— १९९७ चा महा. ३८.

(एक) पोट-कलम (३) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करिता, असे अर्ज १५ सप्टेंबर २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी करण्यात येतील.";

(दोन) पोट-कलम (४) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करिता विहित कालमर्यादेत प्राप्त झालेल्या अशा सर्व अर्जांची मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि ते १० ऑक्टोबर २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी शासनाकडे पाठविण्यात येतील.".

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ३५ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ मधील, पोट-कलम (२) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करिता, संस्था बंद करू इच्छिणारे व्यवस्थापन, १५ सप्टेंबर २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी मंडळाकडे अर्ज करील.".

सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) अध्यादेश, २०२१ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२१ चा महा. अध्या. २.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९.]**

**[ महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. उदय सामंत,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री]

**[ विधानसभेने दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**[ विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई